MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)

# INSTITUTE OF MANAGEMENT AND CAREER COURSES (IMCC)

Approved by AICTE and Recognised by Savitribai Phule Pune University, Pune
IMCC Campus, 131, Mayur Colony, Kothrud, Pune - 411038, Maharashtra, India | Ph.: +91-020-25463453 / 6271 / 73
E-mail : info.imcc@mespune.in | www.mesimcc.org

NBA Accredited MCA Programme

जा. क्र. एम.ई.एस आय.एम.सी.सी./ १६१ /२०१९-२० 　　　　 दिनांक : २४/१२/२०१९

प्रति,
सर्व व्यावसायिक महाविद्यालय/संस्था
पुणे शहर, पुणे जिल्हा.

**विषय :विद्यापीठ अनुदान आयोग / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ह्यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांची वेतननिश्चिती निवडश्रेणी (CAS) निश्चित करण्याबाबतचे शिबीर आयोजनाबाबत.**

**संदर्भ : १. विद्यापीठाचे पत्र क्र. सीसीओ/२९४१ दि.२०/१२/२०१८**
**२. विद्यापीठाचे पत्र क्र. सीसीओ/१०६५ दि.२१/०५/२०१९**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोग / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ह्यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांची वेतननिश्चिती निवडश्रेणी (CAS) निश्चित करण्याबाबतचे शिबीर आयोजन करणेबाबची जबाबदारी आमच्या महाविद्यालयास दिलेली आहे. त्यानुसार शिबीर रविवार दिनांक १९ व सोमवार २० जानेवारी २०२० रोजी (वेळ सकाळी १०.००) विषयानुरूप आयोजित करण्यात आलेले आहे. त्याबाबतचे विषयानुसार वेळापत्रक सोबत जोडले असून त्याच दिवशी/वेळी संबंधीत शिक्षक, प्राचार्य/संचालक, संबंधित विभाग प्रमुख व संस्था प्रतिनिधी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

अर्जदार शिक्षकांनी आमच्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळाला (https://imcc.mespune.in/ ) भेट देऊन आवश्यक ती माहिती व अर्जाचे नमुने download करणे आवश्यक आहे. सदर योग्य ती माहिती भरलेले अर्ज व इतर आवश्यक formats, माहितीची सत्यता दर्शविणाऱ्या कागदपत्रांसाहित ४ प्रतींमध्ये सादर करणे आवश्यक आहे. सविस्तर माहिती वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

विद्यापीठाने दिलेली विषयवार यादी सोबत जोडीत आहोत. सदर यादीतील शिक्षकांना शिबीरसाठी उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरून सूचित करावे हि विनंती.

कळावे,

M.E.S' I.M.C.C. PUNE - 29.

आपला विश्वासू,

संचालक

## करियर अॅडव्हान्समेंट स्किम (कॅस) अंतर्गत नोंदणी करण्यासाठी सूचना

१. **सदर शिबीर हे विद्यापीठ अनुदान आयोग / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ह्यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांची वेतननिश्चिती निवडश्रेणी (CAS) निश्चित करण्यासाठी** (ग्रेड पे- ६००० ते ७०००, ७००० ते ८००० व ग्रेड पे- ८००० ते ९०००, ९००० ते १००००) आहे. **विद्यापीठ अनुदान आयोग / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली ह्यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगातील** याबाबत करण्यात आलेले विविध नियम यांना आधिन राहून सदर शिबीर घेण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

२. विहित केलेल्या नमुन्यातच सर्व उमेदवारांनी आपली माहिती/ कागदपत्रे (API/PBAS/Self Appraisal Form/Avg ३६०° Feedback Score) तयार करून त्यावर आवश्यक त्या प्राधिकारी/अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या/प्रमाणपत्रे घेतल्यानंतर त्या कागदपत्रांच्या ४ प्रती धारिका स्वरुपात (File) शिबिराचे ठिकाणी सादर करणे आवश्यक आहे.

३. शिबिराचे दिवशी सर्व संबंधित मूळ कागदपत्रांसह उमेदवार, प्राचार्य, विभाग प्रमुख (HOD) व संबंधीत महाविद्यालयाच्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे प्रतिनिधी यांनी समक्ष उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

४. यापूर्वी ज्या उमेदवारांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे कडे नावे पाठविली असतील त्यांनी व इतर उमेदवार यांनी देखील सदर शिबिरासाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

५. या सुचनांसोबत शिबिराचे विषयानुसार वेळापत्रक जोडले असून त्यानुसारच सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे.

६. सदर शिबिरासाठीची नाव नोंदणी हि ऑफलाईन पद्धतीने असून त्यासाठीचा नोंदणी अर्ज महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. उमेदवारांना सदर नोंदणी अर्ज योग्य ती सर्व माहिती भरून, डाऊनलोड करून ४ प्रतींमध्ये योग्य त्या कागदपत्रांसहित/जोडपत्रांसहित सदर शिबिरात सदर करणे आवश्यक आहे.

MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)

# INSTITUTE OF MANAGEMENT AND CAREER COURSES (IMCC)

Approved by AICTE and Recognised by Savitribai Phule Pune University, Pune
IMCC Campus, 131, Mayur Colony, Kothrud, Pune - 411038, Maharashtra, India | Ph.: +91-020-25463453 / 6271 / 73
E-mail : info.imcc@mespune.in | www.mesimcc.org

**NBA Accredited MCA Programme**

७. सदर नोंदणी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांवर/जोडपत्रांवर उमेदवार व मा.प्राचार्य/संचालक याची स्वाक्षरी असणे अत्यावश्यक आहे.

८. सदर शिबिराची नोंदणी फी खालील प्रमाणे आहे.

a) रु.३,५००/- प्रती उमेदवार

b) ज्या विषयासाठी २ अथवा त्यापेक्षा कमी उमेदवारांची नोंदणी झालेली असेल अशा उमेदवारांना शिबिराचे दिवशी या विषयाच्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी खालील प्रमाणे रक्कम भरावे लागेल.
रु.७,०००/- प्रती उमेदवार (संबंधित विषयाची उमेदवार संख्या ०२ किवा त्यापेक्षा कमी)

९. सदर नोंदणी फी हि खालील पद्धतीने शिबिराचे दिवशी भरता येईल.

अ) रोखीने भरणा करता येईल (कॅश) ( महाविद्यालय ऑफिस)

ब) डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर "MES Institute of Management and Career Courses" ह्या नावाने काढावा व तो " Payable at Pune" असावा.

क) ऑनलाईन पद्धत (NEFT/RTGS/GOOGLE PAY) :

**Account Name : MES Institute of Management and Career Courses**
**Account Number : 104010100075101**
**Bank Name : Axis Bank Ltd.**
**IFSC Code : UTIB0000104**
**MICR Code : 411211004**

ऑनलाईन पद्धतीने पेमेंट करतांना पेमेंट केल्याचे DOCUMENTARY PROOF (ज्यात Transaction id / Reference Id, Name of Payee etc गोष्टींचा उल्लेख असतो) सोबत जोडणे आवश्यक आहे. **नोंदणी फी ची पावती नोंदणी अर्जासोबत जोडल्याशीवाय शिबिरामध्ये सहभागी होता येणार नाही.**

**१०. सदर शिबिरा संदर्भातील अधिक माहितीसाठी महाविध्यालय भ्रमण ध्वनी क्र. ९८६०४१८३७५ वर संपर्क साधावा.**

M.E.S' I.M.C.C. PUNE - 29.

डॉ. संतोष देशपांडे
संचालक

Head Office: 'MES Bhavan', 1214-1215, Sadashiv Peth, Pune - 411030, Maharashtra, India. | Ph.: +91-020-41038100 | www.mespune.in